# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

अमरावती - ४४४ ६०२ (महाराष्ट्र)

दूरध्वनी क्र. ०७२१- २६६२१७३, वेबसाईट- www.sgbau.ac.in, ई-मेल-reg@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि/पीआरओ/१५१/ ३४२ /२०२५,

दिनांक :०५ /०५/२०२५.

**विषय:-** इलेक्ट्रॉनिक्स मिडीया साठी ऑनलाईन व्हीडीओ चित्रण आदींसाठी दराचे कोटेशन पाठविणेबाबत ...

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने होणारे विविध कार्यक्रम, उपक्रम, उपलब्धी, योजना, आवाहने व सूचनांचे बातमीसह व्हीडीओ चित्रण इलेक्ट्रॉनिक्स मिडीया, सोशल मिडीया व यु-ट्युबवर देण्याकरीता मिडीया सेवा घेण्यासंदर्भात विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने गठित समिती क्रमांक ७/२०१९ च्या शिफारसी मान्य करुन इलेक्ट्रॉनिक्स मिडीया सेवा घेण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेप्रमाणे विद्यापीठात होणारे विविध कार्यक्रम, उपक्रम, उपलब्धी, योजना, आवाहने व सूचनां आदीचे व्हीडीओ चित्रण करुन, त्यावर योग्य ते संस्करण करुन ते इलेक्ट्रॉनिक्स मिडीया, सोशल मिडीया व यु-ट्युबवर अपलोड करण्याकरीता खालीलप्रमाणे दर मागविण्यात येत आहे. कृपया दर आवक शाखेत दि१३/०५/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत पाठवावेत.

| अ.क्र | विवरण | दर (सर्व करासह) |
|---|---|---|
| १) | विविध कार्यक्रम, मुलाखती, उपक्रम, उपलब्धी, योजना, आवाहने व सूचना आदींचे लाईव्ह व्हिडीओ चित्रीकरण व विद्यापीठ युट्यूब चॅनलवर थेट प्रक्षेपण करणे. तसेच याबाबतचा सोशल मिडीया संदेश तयार करुन संबंधितांकडे पाठविणे (कमाल दोन तास मर्यादेपर्यंत तसेच एक कॅमेरा) | |
| २) | थेट प्रक्षेपणासाठी अतिरीक्त व्हिडीओ कॅमेऱ्याची गरज भासल्यास प्रती कॅमेरा दर (दोन तास मर्यादेपर्यंत) | |
| ३) | लाईव्ह उपक्रमांचे प्रक्षेपण दोन तासांपेक्षा अधिक काळासाठी असल्यास त्यानंतरच्या प्रत्येक तासासाठी दर | |
| ४) | थेट प्रक्षेपणासाठी कार्यक्रमाची माहिती होईल अशा स्वरुपाचा डिजीटल फ्लेक्स (इमेज) तयार करुन देणे | |
| ५) | कार्यक्रमाची रिल्स तयार करणे ( प्रती रिल दर ) आयफोन मोबाईल कॅमेरा | |
| ६) | चित्रीकरणाचा व्हिडीओ पेन ड्राईव्ह ( ३२ जीबी क्षमता) मध्ये देण्यासाठी प्रती पेन ड्राईव्ह दर | |

## कामाच्या शर्ती व अटी

१) विद्यापीठातील कार्यक्रम/उपक्रमांची संक्षिप्त सूचना तयार करुन सदर चित्रफित सोशल मिडीयावर अपलोड करावी लागेल.

२) कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटींग झाल्यानंतर चित्रफित विद्यापीठ युट्यूब चॅनलवर अपलोड करावी लागेल.

३) ऑनलाईन प्रसारण करण्यासाठी युट्यूब सह झूमची सुध्दा आपल्याला व्यवस्था करावी लागेल, त्यामध्ये आपल्याला लिंक तयार करुन द्यावी लागेल.

४) विद्यापीठ संगणक विभागाशी समन्वय साधून ज्या ठिकाणाहून लाईव्ह करावयाचा आहे. त्यासाठी इंटरनेट व्यवस्थेची माहिती घेवून एजन्सीला इंटरनेट व्यवस्थेशी जुळवून घ्यावे लागेल.

५) विद्यापीठाने कोणत्याही वेळी आदेशित केल्यास एक तासाचे आत लाईव्ह करण्याची व्यवस्था करुन द्यावी लागेल.

६) सदर काम करणाऱ्या एजन्सीला सोशल मिडीयासाठी चित्रफित तयार करण्याचा किंवा मुलाखती, छायाचित्रण व संपादन करण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव आवश्यक राहील किंवा इलेक्ट्रॉनिक मिडीआ, मुद्रित प्रसार माध्यमे व जनसंपर्क क्षेत्रात कार्यरत एजन्सी अथवा अनुभवी व्यक्ती, ज्यांना शिक्षण क्षेत्रात कार्य करण्याचा अनुभव आहे अशा एजन्सीला प्राधान्य दिले जाईल.

७) उपरोक्त दर सर्व करांसह असतील, याची नोंद घ्यावी व त्याप्रमाणे दर देण्यात यावे.

८) कोटेशन सादर करतेवेळी शॉप ॲक्ट चे नोंदनी असल्याचे दस्तऐवज सोबत जोडावे लागेल.

९) चित्रण दर्जेदार कॅमेराव्दारे करावे लागेल.

१०) एडिटींग व अनुषंगिक सॉफ्टवेअर संबंधित फर्मला उपलब्ध करुन द्यावे लागेल.

११) रेकॉर्ड केलेली चित्रफित पेन ड्राईव्ह मध्ये उपलब्ध करुन द्यावी लागेल.

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रतिलिपी माहितीस्तव - सहा.कुलसचिव(प्रशा), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ